**बृहन्मुंबई महानगरपालिका**

# जाहिरात

**''पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय अधिकारी'' या पदांकरिता तदर्थ तत्वावरील सरळसेवा भरती**

**बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अंतर्गत सार्वजनिक आरोग्य खात्यातील प्रमुख वैद्यकीय अधीक्षक खाते प्रमुख (माआसे) यांच्या अखत्यारीत १६ उपनगरीय रुग्णालयाच्या आस्थापनेवरील** पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग व प्रसुतिशास्त्र), पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय अधिकारी (बालरोग चिकित्सा),पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय अधिकारी (अस्थिव्यंग), पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय अधिकारी (वैद्यकीय /भिषक), पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय अधिकारी (शल्यक्रिया शास्त्र), पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय अधिकारी (बधिरीकरण) या संवर्गातील रु. १५६००-३९१०० अधिक रु. ६०००/- या वेतनश्रेणीत खालील तक्त्यात नमूद केलेली पदे **तदर्थ तत्वावर** राज्य शासनाच्या मंजुरीसापेक्ष एकावेळी सहा महिन्यांपेक्षा जास्त नाही अशा कालावधीसाठी भरण्यासाठी निवडयादी तयार करण्यासाठी उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| क्र. | पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय अधिकारी* (PGMO) | रिक्त पदांची संख्या |
|---|---|---|
| १ | स्त्रीरोग व प्रसुतिशास्त्र | २० |
| २ | बालरोग चिकित्सा | २९ |
| ३ | अस्थिव्यंग | १५ |
| ४ | वैद्यकशास्त्र | ४९ |
| ५ | शल्यक्रिया शास्त्र | २६ |
| ६ | बधिरीकरण | ८९ |
| | एकूण पदे | २२८ |

**वेतनश्रेणी -**

रु. १५६०० - ३९१०० अधिक ग्रेड पे रु. ६०००/- अधिक नेहमीचे अनुज्ञेय भत्ते.

**वयोमर्यादा :-**

- खुल्या प्रवर्गातील पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांचे वय दि. ०१.०८.२०१९ रोजी १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा अधिक असता कामा नये. मागासप्रवर्गाच्या आरक्षित पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत ४३ वर्षापेक्षा अधिक असता कामा नये.
- अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेमध्ये असल्यास उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा नाही.
- शारीरिकदृष्ट्या अपंग असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल.
- माजी सैनिकांना सेवेमध्ये वयोमर्यादा सवलत शासन निदेशानुसार प्रकरण परत्वे लागू करण्यात येईल.

**सर्वसाधारण सूचना:**

| | |
|---|---|
| **अर्ज प्राप्त होण्याचे ठिकाण** | **के.बी. भाभा मनपा सर्वसाधारण रुग्णालय, बांद्रा (प.) ७ वा मजला, डॉ. आर.के. पाटकर मार्ग, मुंबई- ४०००५०.** |
| **अर्ज विक्री व स्वीकृतीचा कालावधी** | **दि. १७.०१.२०२० ते दि. ३१.०१.२०२० (सुट्टीचे दिवस वगळता कार्यालयीन वेळेत सकाळी ११.०० ते संध्याकाळी ४.३० वाजेपर्यंत.)**<br>**दि. ३१.०१.२०२० नंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.** |

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर सदर जाहिरातीबाबतची सविस्तर माहिती, समांतर व सामाजिक आरक्षण, शैक्षणिक अर्हता निवडीचे निकष, अटी/ शर्ती, सविस्तर जाहिरात दि. १७.०१.२०२० पासून उपलब्ध होईल. संकेतस्थळवरील जाहितीला अनुसरून विहित अर्हता व अटींची पूर्तता करणाऱ्या पात्र व इच्छुक उमेदवारांनी अर्ज सादर करावा. उमेदवारांनी अर्ज सादर करण्यापूर्वी संकेतस्थळवरील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.

**सही/-**
**प्र.वै.अ. व खातेप्रमुख**
**(माध्यमिक आरोग्य सेवा)**

**PRO/1776/ADV./19-20**

**घराघरांत धुर आणि डासनाशकांची फवारणी करून घ्या.**